**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

VOL- IX | ISSUE- XI | NOVEMBER | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# न्यायमंडळातील नियुक्ती व द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या शिफारसी

**श्री. हर्षवर्धन शंकर यादव.**
(संशोधक, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग,
हिंद सेवा मंडळाचे पेमराज सारडा महाविद्यालय,
अहमदनगर- 414001)

**डॉ. वहिदा शेख.**
(संशोधन मार्गदर्शक व राज्यशास्त्र विभागप्रमुख,
आबिदा इनामदार सीनिअर कॉलेज ऑफ
आर्टस्, सायन्स & कॉमर्स, पुणे [स्वायत्त])

**सारांश:**

*उच्च व सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायाधीश नियुक्ती करण्यासंदर्भातील वाद गेली दोन दशकाहून अधिक काळ चर्चेत आहे. नियुक्ती तसेच बदली करण्याची योग्य पद्धत कोणती असावी? यासंदर्भात सरकार व न्यायमंडळ सतत विविध भूमिका मांडते. पद्धतीमध्ये पारदर्शकता असण्याबरोबर न्यायिक स्वातंत्र्याचेही अस्तित्व असावे व त्याद्वारे कार्यक्षम न्यायाधीशांची नियुक्ती व्हावे, ही भारतासारख्या मोठ्या लोकशाही राष्ट्राची आवश्यकता आहे. त्यामुळे यासंदर्भात द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोगाने केलेल्या शिफारसी विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते.*

**महत्वाच्या संकल्पना (Keywords):** न्यायमंडळ, कॉलेजियम, पारदर्शकता, न्यायिक स्वातंत्र्य, द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोग, राष्ट्रीय न्यायिक परिषद, राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग.

## प्रस्तावना

उच्च व सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती करणाऱ्या कॉलेजियमच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या आजी- माजी न्यायमूर्ती आणि देशाच्या कायदा मंत्र्यांनी एकमेकांविरुद्ध भूमिका घेतल्याचे दु:खद चित्र सध्या दिसून येत आहे. कॉलेजियम पद्धतीत दोष असल्याचा आणि तिला संवैधानिक वैधता नसल्याचा दावा कायदामंत्री किरण रिजिजू यांनी जाहीरपणे केला असून, गेली किमान तीस वर्षे व्यवहारात असलेली ही पद्धत मोडीत काढण्याच्या प्रयत्नांविरुद्ध सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ न्यायमूर्तींनी आक्रमक भूमिका घेतली आहे. शिफारस केलेल्या नावांना नियुक्ती न दिल्यास वेगळी पावले उचलू असा संदेश आपल्या म्हणण्यातून न्यायालयाने कायदा मंत्रालयाला दिला आहे. उच्च व सर्वोच्च न्यायालयासाठी कॉलेजियमने शिफारस केलेल्या 21 जणांची यादी कायदा मंत्रालयाने पारित न केल्याने हा वाद निर्माण झाल्याचे दिसून येते. प्रचलित पद्धतीनुसार कॉलेजियमची शिफारस सरकार नकारू शकत नसून, यादीतील नावे पसंत नसल्यास पुनर्विचारासाठी कॉलेजियमला पाठवणे एवढेच केंद्र सरकारच्या हातात असते. फेरविचारानंतर हीच नावे पुन्हा आल्यास सरकारला ती मान्य करावीच लागतात. कायदामंत्री रिजिजू यांनी मुंबई उच्च न्यायालयासाठी संतोष चपळगावकर व मिलिंद साठे या दोघांच्या नियुक्तीला संमती दर्शवली असून इतर 19 जणांची नियुक्ती प्रलंबित ठेवली आहे. इतर 19 जणांमध्ये फेरविचाराअंती शिफारस केलेली अलाहाबाद उच्च न्यायालयासाठी 5, कोलकत्ता व केरळ उच्च न्यायालयसाठी प्रत्येकी 2 व कर्नाटक उच्च न्यायालयाचे साठी 1 अशी दहा नावे आहेत. या शिवाय मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश दिपांकर दत्ता यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्ती ही प्रलंबित आहे.

## कॉलेजियम व्यवस्था काय आहे ?

कॉलेजियम व्यवस्था ही एक पद्धत आहे ज्याद्वारे सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांच्या नियुक्ती आणि बदलीची प्रक्रिया केली जाते. कॉलेजियम व्यवस्थेची नोंद संविधानात कोठेही नसून, संसदेने जारी केलेल्या कोणत्याही विशिष्ट कायद्यात तिचा उगम नाही. ही व्यवस्था सर्वोच्च न्यायालयाच्या विविध न्याय-निवाड्यांद्वारे कालांतराने विकसित झाली आहे.

सुप्रीम कोर्ट कॉलेजियम ही पाच सदस्यांची संस्था असून याचे अध्यक्ष देशाचे विद्यमान सरन्यायाधीश (CJI)

आहेत. उर्वरित सदस्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयातील इतर चार ज्येष्ठ न्यायाधीशांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे, उच्च न्यायालयाच्या कॉलेजियमचे नेतृत्व सध्याचे मुख्य न्यायाधीश आणि त्या न्यायालयाचे इतर चार ज्येष्ठ न्यायमूर्ती करतात. तथापि, उच्च न्यायालयाद्वारे सुचवलेली नावे सरन्यायाधीश आणि सर्वोच्च न्यायालय कॉलेजियमच्या अनुमोदनानंतरच सरकारकडे पोहचवली जातात. कोणताही सदस्य आपल्या पदावरून निवृत्त होईपर्यंत कॉलेजियममध्ये राहू शकतो.

कॉलेजियमच्या पसंतीवर किंवा निवडीवर सरकार आक्षेप घेऊ शकते आणि स्पष्टीकरणही मागू शकते, परंतु कॉलेजियमने पुन्हा त्याच नावांची शिफारस केल्यास, सरकार त्यांना न्यायाधीश म्हणून नियुक्त करण्यास बांधील आहे.

**न्यायाधीशांच्या नियुक्तीबाबत संविधान काय म्हणते?**

संविधानातील कलम 124(2) आणि 217 सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांमधील न्यायाधीशांच्या नियुक्तीशी संबंधित आहे. या नियुक्त्या राष्ट्रपती करतात. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांशी सल्लामसलत केल्यानंतरच या नियुक्त्या केल्या जातात. तथापि, या नियुक्त्यांसाठी राज्यघटनेने कोणतीही विशिष्ट प्रक्रिया नमूद केलेली नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या इतर न्यायाधीशांशी सल्लामसलत करून राष्ट्रपती सरन्यायाधीशांची नियुक्ती करतात तर सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नियुक्ती भारताच्या सरन्यायाधीशांशी अनिवार्य सल्लामसलत केल्यानंतर राष्ट्रपती करतात. दुसरीकडे, उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींची नियुक्ती राष्ट्रपती भारताचे सरन्यायाधीश, राज्याचे राज्यपाल यांच्याशी सल्लामसलत करून करतात आणि मुख्य न्यायाधीशाखेरीज अन्य न्यायमूर्तींच्या नियुक्तीच्या बाबतीत उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींचा सल्ला घेतला जातो.

**कॉलेजियम व्यवस्था कशी विकसित झाली?**

- 'फर्स्ट जजेस केस 1981':

एसपी गुप्ता विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (1981) मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने, बहुमताने निर्णय दिला की, भारताच्या सरन्यायाधीशांची प्रधानता ही संकल्पना प्रत्यक्षात घटनेत समाविष्ट केलेली नाही.

कलम 124 आणि 217 मध्ये वापरण्यात आलेल्या 'सल्ला' शब्दाचा अर्थ 'सहमती' असा होत नाही, असेही घटनापीठाने नमूद केले. अर्थात नियुक्ती करण्यासाठी अध्यक्ष जरी या कार्यकारिणींचा सल्ला घेतील, तरी त्यांचा निर्णय या सर्वांशी सहमत असणे बंधनकारक नव्हते.

- 'सेकंड जजेस केस 1993':

सुप्रीम कोर्ट ॲडव्होकेट्स-ऑन-रेकॉर्ड असोसिएशन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (1993), मध्ये 9 न्यायाधीशांच्या घटनापीठाने 'एसपी गुप्ता' मधील निर्णय रद्द केला. त्यांनी उच्च न्यायव्यवस्थेतील न्यायाधीशांच्या नियुक्त्या आणि बदलीसाठी एक विशिष्ट प्रक्रिया, 'कॉलेजियम व्यवस्था' सादर केली. त्याच बरोबर, न्यायिक कुटुंबाअंतर्गत विषय असल्याकारणाने सरन्यायाधीशांची भूमिका स्वभावतः मूलभूत मानली गेली व कार्यकारिणीला या प्रकरणात समान हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाकारला गेला.

- 'थर्ड जजेस केस 1998':

1998 मध्ये, तत्कालीन राष्ट्रपती के.आर. नारायणन यांनी 'सल्ला' या शब्दाच्या अर्थाबाबत संविधानाच्या कलम 143 (सल्लागार अधिकारक्षेत्र) अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाला 'राष्ट्रपती संदर्भ (प्रेसिडेंशल रेफरेंस)' लागू केला. प्रश्न असा होता की, अनेक न्यायाधीशांशी सल्लामसलत करणे म्हणजे भारताच्या सरन्यायाधीशांचे मत होते की एकट्या सरन्यायाधीशांचे स्वतःचे मत 'सल्ला' असू शकते. सर्वोच्च न्यायालयाने हे मान्य केले की, ही शिफारस सरन्यायाधीश आणि त्यांच्या चार वरिष्ठ सहकाऱ्यांनी करावी.

**कॉलेजियम व्यवस्थेच्या समर्थनार्थ मुद्दे**

- अधिकारांचे पृथक्करण: हे स्वतःच्या न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचे न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यास मदत करते.
- राजकारणीकरण टाळते: न्यायाधीश स्वत: निर्णय घेत असल्याने, कार्यकारिणीचा कोणताही राजकीय हेतू दूर राहतो. उदाहरणार्थ कार्यकारिणी मागणीनुसार नागरी सेवकांच्या प्रमाणे न्यायाधीशांची होणारी बदली प्रतिबंधित करते.
- डोमेन एक्सपर्टाइज: सरन्यायाधीशांच्या तुलनेत कार्यकारी मंडळास न्यायाधीशांच्या आवश्यकतांबद्दल माहिती नाही किंवा तज्ज्ञता नाही.

- गुप्तता: संस्थेच्या योग्य आणि प्रभावी कामकाजासाठी गुप्त ठेवण्यायोग्य बाबी गुप्त राहतात.
- सल्लागार प्रक्रिया: कॉलेजियम वरिष्ठ न्यायाधीशांशी सल्लामसलत केल्यानंतर शिफारसी करते.
- सरकार एक प्रमुख याचिकाकर्ता: सरकार अनेक बाबींमध्ये एक प्रमुख याचिकाकर्ता असल्याने, त्याला नियुक्तींमध्ये समाविष्ट करणे म्हणजे न्यायालयाचा न्याय निश्चित (Fix) करणे होय.

**कॉलेजियम व्यवस्थेशी संबंधित प्रमुख समस्या**

- कार्यकारी मंडळाचा बहिष्कार: न्यायिक नियुक्ती प्रक्रियेतून कार्यकारी मंडळाला पूर्णपणे वगळण्यात आल्याने अशी व्यवस्था निर्माण झाली आहे जिथे काही न्यायाधीश संपूर्ण गुप्ततेने इतर न्यायाधीशांची नियुक्ती करतात. तसेच, ते कोणत्याही प्रशासकीय संस्थेला उत्तरदायी नसतात ज्यामुळे योग्य उमेदवाराकडे दुर्लक्ष करून चुकीचा उमेदवार निवडला जाऊ शकतो.
- पक्षपातीपणा आणि घराणेशाहीची शक्यता: कॉलेजियम व्यवस्था सरन्यायाधीश पदासाठी उमेदवाराचे परीक्षण करण्यासाठी कोणतेही विशिष्ट निकष प्रदान करत नाही, ज्यामुळे पक्षपात आणि घराणेशाहीची व्यापक शक्यता निर्माण होते. यामुळे न्यायालयीन व्यवस्थेच्या अपारदर्शकतेला वाव मिळतो, जो देशातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या नियमनासाठी अत्यंत हानिकारक आहे.
- चेक अँड बॅलन्स तत्त्वाच्या विरुद्ध: या व्यवस्थेमध्ये चेक अँड बॅलन्स तत्त्वाचे उल्लंघन केले जाते. भारतात व्यवस्थेची तीन अंगे - विधिमंडळ, कार्यकारीमंडळ आणि न्यायमंडळ ही अंशतः स्वतंत्रपणे काम करतात, परंतु कोणत्याही अवयवाच्या अतिअधिक अधिकारांवरही ते नियंत्रण आणि संतुलन ठेवतात. कॉलेजियम व्यवस्था न्यायव्यवस्थेला प्रचंड शक्ती प्रदान करून नियंत्रणाची कोणतीही व्यवस्था करत नाही, त्याकारणाने दुरुपयोग होण्याची शक्यता असते.
- 'क्लोज-डोर मॅकेनिज्म': समीक्षकांनी निदर्शनास आणले आहे की या व्यवस्थामध्ये कोणतेही अधिकृत सचिवालय गुंतलेले नाही. याकडे 'क्लोज-डोर मॅकेनिज्म' म्हणून पाहिले जाते, जिथे कॉलेजियमच्या कामकाजाची आणि निर्णय प्रक्रियेबद्दल कोणतीही सार्वजनिक माहिती उपलब्ध नसते. याशिवाय कॉलेजियमच्या कार्यवाहीचे कोणतेही अधिकृत कार्यवृत्तही नोंदवले जात नाही.
- असमान प्रतिनिधित्व: चिंतेचे आणखी एक क्षेत्र म्हणजे उच्च न्यायव्यवस्थेची रचना, जिथे महिलांचे प्रतिनिधित्व खूपच कमी आहे.

**द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या शिफारसी**

द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोग हा भारतीय प्रशासन यंत्रणेच्या सुधारणेसाठी भारत सरकारने ठराव क्र. K-11022/9/2004-RC द्वारे स्थापना केलेली समिती होती. ऑगस्ट 2005 मध्ये कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री वीरप्पा मोइली यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या या आयोगाच्या विनिता रॉय या सदस्या-सचिव होत्या. भारत सरकारची संगठनात्मक रचना, शासनामधील नैतिकता, कर्मचारी प्रशासनामध्ये सुधारणा, वित्तीय व्यवस्थापनाचे सुदृढीकरण, राज्यस्तरीय प्रशासनाची प्रभावी कार्यरतता, प्रभावी जिल्हा प्रशासन; स्थानीय स्वशासन व पंचायत राज सशक्तीकरण, सामाजिक भांडवल, विश्वास तसेच सहभागी लोकसेवा निष्पन्नता, नागरिक केंद्रित प्रशासन, ई-शासनाची उन्नती, संघवादाचे परीक्षण, आपत्तीचे व्यवस्थापन आणि लोकव्यवस्था- या संबंधित प्रशासकीय मुद्द्यांचा अभ्यास करणे व त्यासंबंधी सुधारणा हेतू उपाय सुचविण्याची जबाबदारी भारत सरकारने या आयोगास सोपविली होती. 31 मे, 2009 मध्ये या आयोगाने भारत सरकारला या विषयांसंदर्भात एकूण 15 अहवाल सुपूर्त केले.

न्यायमंडळातील नियुक्तींसंदर्भात विवेचन करताना द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोगाने पुढील शिफारसी केलेल्या आहेत:

(अ) कार्यकारीमंडळ, कायदेमंडळ आणि न्यायमंडळाचे प्रतिनिधी असलेल्या मंडळाद्वारे न्यायमंडळाच्या सदस्याची नियुक्ती केली जावी. या वैश्विकरीत्या स्वीकृत तत्वाधारे

'राष्ट्रीय न्यायिक परिषद' (NJC) स्थापन करण्यात यावी. या परिषदेची रचना पुढीलप्रमाणे असावी -

- उपराष्ट्रपती हा परिषदेचा अध्यक्ष असेल
- पंतप्रधान
- लोकसभा अध्यक्ष
- भारताचे सरन्यायाधीश
- कायदा मंत्री
- लोकसभेतील विरोधी पक्षनेता
- राज्यसभेतील विरोधी पक्षनेता

उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती आणि पर्यवेक्षणासंदर्भात परिषदेमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल- (1) संबंधित राज्याचा मुख्यमंत्री (2) संबंधित उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश.

(ब) राष्ट्रीय न्यायिक परिषदेला कनिष्ठ न्यायमंडळासह न्यायाधीशांसाठी आचारसंहिता तयार करण्याचे अधिकार असावेत.

(क) परिषदेकडे सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नियुक्तीची शिफारस करण्याचे कार्य सोपविण्यात यावे. परिषदेला न्यायाधीशांवर पर्यवेक्षण करण्याचे कार्य सोपविण्यात यावे आणि गैरवर्तनाच्या आरोपांची चौकशी करून किरकोळ शिक्षा देण्याचा अधिकार असावा. प्रकरण फारच गंभीर असेल तर न्यायाधीशाला पदमुक्त करण्याची शिफारस करावी.

(ड) राष्ट्रीय न्यायिक परिषदेच्या शिफारशीवरून राष्ट्रपतीला सर्वोच्च वा उच्च न्यायालयातील न्यायाधीशाला पदमुक्त करण्याचा अधिकार असेल.

(इ) राष्ट्रीय न्यायिक परिषदेची तरतूद करण्यासाठी राज्यघटनेच्या कलम 124 मध्ये सुधारणा करण्यात यावी. अनुच्छेद 217 मध्येही अशीच सुधारणा करण्यात यावी. न्यायाधिशांची तपासणी करणे आणि शिस्तीत ठेवणे याचा अधिकारही परिषदेला दिला असल्याने, कलम 217 (कलम 4) मध्ये हा ही बदल करणे आवश्यक आहे.

(फ) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीची न्यायिक मूल्ये आयुक्तपदी नियुक्ती करावी. त्यांना आचारसंहिता लागू करण्याचे काम दिले पाहिजे. उच्च न्यायालयातही अशीच व्यवस्था व्हायला हवी.

**राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग (NJAC)**

केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांमधील न्यायाधीशांच्या नियुक्तीच्या सध्याच्या पद्धतीत बदल करण्यासाठी राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग कायदा, 2014 आणि 99वा घटना सुधारणा कायदा, 2014 प्रस्तुत केला. भारताचे सरन्यायाधीश, न्यायाधीशांची नियुक्ती करण्यासाठी या राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाचे अध्यक्षपद भूषवणार होते. याशिवाय सर्वोच्च न्यायालयाचे दोन वरिष्ठ न्यायाधीश, केंद्रीय कायदा मंत्री आणि दोन प्रतिष्ठित व्यक्तीही आयोगाचा भाग होत्या. आयोगातील दोन प्रतिष्ठित व्यक्तींची निवड पंतप्रधान, सरन्यायाधीश आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते किंवा सर्वात मोठ्या विरोधी पक्षाच्या नेत्याचा समावेश असलेल्या त्रिसदस्यीय समितीद्वारे केली जाणार होती.

मात्र, ते अधिसूचित होण्यापूर्वीच, न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्यात हस्तक्षेप करण्याचा सरकारचा प्रयत्न म्हणून त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने 99 वी घटनादुरुस्ती 4-1 च्या बहुमताने रद्द केली. न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की "NJAC मध्ये न्यायिक घटकांना पुरेसे प्रतिनिधित्व दिले गेले नाही. राज्यघटनेतील नवीन तरतुदी न्यायाधीशांची निवड आणि नियुक्ती यांच्या संदर्भात न्यायव्यवस्थेची सर्वोच्चता सुरक्षित ठेवण्यासाठी अपुरी आहेत." न्यायालयाने पुढे असे निरीक्षण नोंदवले की "अनुच्छेद 124A(1) हे संविधानाच्या तरतुदीं विरोधात जाते, कारण केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्र्याचा NJAC चे पदसिद्ध सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे." न्यायालय पुढे असे ही म्हणते की, "ही दुरुस्ती 'न्यायपालिकेचे स्वातंत्र्य'सोबत 'अधिकारांचे पृथक्करण'च्या तत्त्वां विरोधात आहे. NJAC चे सदस्य म्हणून दोन 'प्रसिद्ध व्यक्ती' समाविष्ट करण्याची तरतूद संविधानातील तरतुदींविरोधात आहे."

**निष्कर्ष**

वर्तमान न्यायव्यवस्थेसमोर अनेक समस्या आहेत. त्या समस्यांवरील समाधानासाठी न्यायव्यवस्थेमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणणे आवश्यक आहे. नेमणूक करण्यात आलेले न्यायाधीश किती कार्यक्षम आहेत हा महत्वाचा मुद्दा असून, नियुक्तीमध्ये न्यायिक उत्तरदायित्व आणि न्यायिक

स्वातंत्र्य यांच्यात समतोल असणे महत्त्वाचे आहे. न्यायिक नियुक्त्या या जात-धर्म-वर्ग-लिंग तटस्थ असणेही देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्वपूर्ण आहे. भारतातील नियुक्तीची वर्तमान व्यवस्था सार्वजनिक स्वरुपात छाननीसाठी खुली नसून त्यामध्ये उत्तरदायित्व व पारदर्शिकतेचा अभाव अनेकदा आढळून येतो. जगामधील इतर कोणत्याही देशातील न्यायमंडळ आपल्या नियुक्ती संदर्भात अंतिम स्वरुपात भूमिका मांडत नाही. विविध देशांमधील व्यवस्थेच्या तुलनात्मक विश्लेषणातून ही बाब स्पष्ट होते की, या देशांमध्ये न्यायपालिकेसाठी शिफारस करण्यासाठी एक समिती स्थापन्यात आली असून या समितीमध्ये अशा लोकांना सहभागी केले आहे जे अनिवार्यतः फक्त न्यायमंडळाचे नसून संभवतः प्रतिष्ठावान व्यक्ती ही असू शकतील.

लोकशाही प्रजासत्ताकात स्वत:वर आणि स्वतःच्या स्थानावर विश्वास असलेल्या न्यायव्यवस्थेला न्यायालयीन नियुक्त्या सार्वजनिक क्षेत्रात आणण्यासंबंधात काळजी करण्याची आवश्यकता नाही. त्यासाठी द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या शिफारसी लक्षात घेऊन न्यायिक नियुक्ती पद्धतीत काही बदल करून अधिक पारदर्शकता आणता येऊ शकते. द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोगाने शिफारस केलेल्या राष्ट्रीय न्यायिक परिषदेमध्ये सरन्यायाधीशास नकाराधिकार (Veto Power) असावा. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती करताना सरन्यायाधीश इतर 4 वरिष्ठ न्यायाधीशांशी सल्लामसलतीद्वारे नकाराधिकाराचा वापर करेल. उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश नियुक्तीमध्ये सरन्यायाधीश त्या न्यायालयाच्या वरिष्ठ 4 न्यायाधीशांशी सल्लामसलतीद्वारे नकाराधिकाराचा वापर करेल तर न्यायाधीश नेमणुकीमध्ये तो मुख्य न्यायाधीशासह वरिष्ठ 4 न्यायाधीशांशी सल्लामसलत करेल. याशिवाय परिषदेचे सर्व कामकाज 'इन कॅमेरा' घ्यावे, जेणेकरून निर्णयांमध्ये सरकार किंवा न्यायामंडळाद्वारे घेण्यात येणारे अकारण आक्षेप स्पष्ट होतील. अशाप्रकारे नियुक्तीमध्ये न्यायिक उत्तरदायित्व आणि न्यायिक स्वातंत्र्य यात सुवर्णमध्य साधता येईल.

**संदर्भ**

1. इपीडब्लू एंगेज, 2020, "कॉलेजियम सिस्टम इन द इंडिअन जुडिसिअरी नीड्स टू बी रीफॉर्मड फॉर ग्रेटर ट्रान्स्परंसी अँड अकौंटीबीलीटी", इपीडब्लू, 19 फेब्रुवारी, ऑनलाईन आवृत्ती
2. एक्सप्लैन्ड डेस्क, 2022, "डिबेट ओव्हर द कॉलेजियम सिस्टिम्स: हाऊ आर एससी अँड एचसी जजेस अपोइंटेड", 8 ऑक्टोंबर, ऑनलाईन आवृत्ती
3. दुष्यंत दवे, 2021, "व्हॉट इज द कॉलेजियम सिस्टिम्स् रोल इन प्रोटेक्टिंग डेमोक्रसी?", इंडिअन एक्स्प्रेस, 9 जुलै, ऑनलाईन आवृत्ती
4. प्रा. अविनाश कोल्हे, 2022, "पुन्हा एकदा 'कॉलेजियम'वरून कल्ला", तरुण भारत, 21 नोव्हेंबर, ऑनलाईन आवृत्ती
5. लक्ष्मीकांत एम., 2016, "इंडिअन पॉलिटी", मॅग्रोहिल एज्युकेशन
6. सेकंड अॅडमिनिस्ट्रेटीव्ह रीफोर्म्स कमिशन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, फोर्थ रिपोर्ट (2007) ऑन एथिक्स इन इंडिया
7. हेमंत सिंग, 2019, "कॉलेजियम सिस्टम क्या होता है?", जागरण जोश, 9 मे, ऑनलाईन आवृत्ती